दे प्रजावाणी (1) 23/7

## विभागीय आयुक्तांच्या समितीने प्रभाग रचना केल्यामुळे

# आक्षेपांवर सुनावणीसाठी मराठवाड्याबाहेरील अधिकारी

नांदेड,दि.२२: महापालिकेची प्रभाग रचना विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली तयार झाल्यामुळे येत्या २९ जुलै रोजी होणाऱ्या आक्षेपांच्या सुनावणीसाठी राज्य निवडणूक आयोगाकडून मराठवाड्या-बाहेरील सनदी अधिकाऱ्याची नियुक्ती होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. प्राप्त माहितीनुसार मंत्रालयातील सचिव दर्जाच्या एखाद्या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याचा विचार आयोगाकडून सुरु आहे.

२०१२ साली झालेल्या महापालिका निवडणुकीची प्रभाग रचना मनपा आयुक्तांनी तयार करुन त्यास राज्य निवडणूक आयोगाची मान्यता घेण्यात आली होती. परंतु आगामी निवडणुकीसाठी ही जबाबदारी आयोगाने विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील जिल्हाधिकारी आणि संबंधित मनपा आयुक्तांच्या संयुक्त समितीवर सोपवली. या समितीने तयार केलेल्या प्रारुप प्रभाग रचनेस विहित कालावधीत आयोगाने मान्यता दिली नाही. त्यामुळे २३ जून रोजी होणारी आरक्षणाची सोडत ६ जुलै रोजी काढावी लागली. त्यातही चूक झाल्यामुळे १० जुलै रोजी फेरसोडत काढावी लागली.

**प्रभाग रचनेवर ८० आक्षेप :** ११ जुलै रोजी मनपाची प्रभाग रचना व आरक्षण सोडतीचा तपशील शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आला. दि. १९ जुलै पर्यंत त्यावर हरकती व सूचना मागविण्यात आल्या. या कालावधीत प्रभागरचनेबाबत ८० व आरक्षण सोडतीबाबत दोन असे एकूण ८२ आक्षेप दाखल झाले आहेत. कौठा, सिडको आणि तरोडासारख्या काही प्रभागाच्या. रचनेवर एकही आक्षेप दाखल झालेला नाही.

**१० ऑगस्ट रोजी निर्णय :** प्राप्त झालेल्या आक्षेपांवर येत्या २९ जुलै रोजी राज्य निवडणूक आयोगाने प्राधिकृत केलेल्या ज्येष्ठ सनदी अधिकाऱ्यांकडून सुनावणी घेऊन ■ पान २ वर



### आक्षेपांचे काय होणार?

प्रभाग रचनेच्या बाबतीत राजकीय पुढारी, कार्यकर्ते व नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर आक्षेप दाखल घेतले असले तरी बहुतांश जणांनी आपापल्या प्रभागापुरता आक्षेप घेतला आहे. परंतु विशिष्ट प्रभागाला एखादा भाग जोडणे किंवा तोडण्याचा विचार केल्यास मनपाची संपूर्ण प्रभाग रचना बदलावी ■ पान २ वर

### आक्षेपांवर सुनावणीसाठी...

सविस्तर म्हणणे ऐकून घेतले जाईल. त्यानंतर नियमातील तरतूद व आक्षेपांमध्ये तथ्य असल्यास राज्य निवडणूक आयोगाशी विचारविनिमय करुन निर्णय दिला जाणार आहे. प्राधिकृत अधिकाऱ्यांकडून ५ ऑगस्टपर्यंत आक्षेपांवरील निर्णयाचा मसुदा राज्य निवडणूक आयोगाकडे मान्यतेसाठी पाठविला जाणार असून १० ऑगस्ट रोजी सुनावणीवरील निर्णय दिला आहे. १४ ऑगस्ट २०१७ रोजी अंतीम प्रभाग रचना व आरक्षणाचा तपशील राज्य निवडणूक आयोगामार्फत शासन राजपत्रात प्रसिद्ध केला जाणार आहे.

### आक्षेपांचे काय ...

लागेल, आणि तशी शक्यता कमी असेल, असे सांगितले जात आहे. आरक्षणाच्या बाबतीत राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार कार्यवाही केली गेली असल्यामुळे आयोग आपल्या निर्णयाचा पुनर्विचार करेल काय, हे सुनावणीसाठी येणाऱ्या सनदी अधिकाऱ्याच्या मतावर अवलंबून असेल.